राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक- १४+९६/२०२६/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

तक्रारदार	जन माहिती अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकारी
संभाजी भानुदास दिवेकर	तहसिलदार (पुनर्वसन जिल्हा पुनर्वसन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय पुणे.	उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) जिल्हा पुनर्वसन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय पुणे.

(निर्णय दि. १६.०७.२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक १६.०१.२०२६, १८.०३.२०२६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केलेले आहेत. सदर तक्रारी मध्ये तक्रारदार यांनी द्वितीय अपील क्रमांक- २४७८/२०२४/पुणे प्रकरणी ' जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाचे योग्य प्रकारे पालन केले नाही, अपुर्ण दिशाभूल करणारी, चुकीची माहिती दिली आहे तरी संबंधितावर कारवाई करावी, अशी मागणी आयोगाकडे केली आहे.

तक्रारीशी संबंधित द्वितीय अपील क्रमांक प्रकरणी आयोगाने सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना सुनावणीअंती माहिती पुरवण्याबाबत व प्रथम अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्याबाबत सुस्पष्ट निर्देश दिले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सर्व सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. तथापि तक्रारदार यांनी केलेली तक्रार पाहता सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या या आदेशाचे काटेकोरपणे पालन केले असल्याचे दिसून येत नाही.

सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक केमाअ २००८/६८८/प्र.क्र. २१९/०८/६ (मा.अ.) दिनांक - १० जून २००८ अन्वये सर्व सार्वजनिक प्राधिकरणास राज्य माहिती आयोगाकडून पारित होणारे निर्णय निर्देश इत्यादींचे काटेकोरपणे पालन करण्यासंदर्भात सूचना दिल्या असून याबाबत कर्तव्यच्युती करणाऱ्या विरुद्ध संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने तातडीने विभागीय कार्यवाही करावी असे सूचित करण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (८) क प्राप्त अधिकारांन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) जिल्हा पुनर्वसन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय पुणे. यांना या आदेशान्वये सूचित करण्यात येते की तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने द्वितीय अपील प्रकरणी पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची आपल्या स्तरावर तपासणी करण्यात यावी. सदर प्रकरणी आयोगाच्या आदेशाचे नुसार अद्याप कार्यवाही केली नसल्यास ती तात्काळ करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सर्व पुरावादर्शक कागदपत्रासह आयोगास ३० दिवसात सादर करावा.

आदेश

वरील निर्देशासह तक्रारदार यांचे तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक - १४+९६/२०२६/पुणे

जावक क्र- 3538 दिनांक- 30/7/2026